मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, खुलताबाद यांच्या न्यायालयात.

क्रि.एम.ए.नं. --63-----/२०२६

अर्जदार :- मुजाहिद पि. निसार कुरेशी
वय - २३ वर्ष, धंदा - व्यापार
रा. कुरेश मोहल्ला खुलताबाद,
ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद.

**विरूद्ध**

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस स्टेशन, खुलताबाद.

गुन्हा क्र. :- ३४/२०२५ प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११(१)(e), ११(१)(h) प्रमाणे तसेच महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, १९७६ चे कलम ५बी प्रमाणे.

---

Call the say of I.O
& APP PLM 10/3/26

07/3/26
Jt. Judicial Magistrate
F.C. Khultabad

प्रकरण :- कलम ५०३ बी. एन. एस. एस. कायदयाप्रमाणे अर्जदाराच्या मालकीचे पांढ-या रंगाचे दोन खिल्लार बैल अर्जदारास परत मिळणेबाबत.

---

महोदय,

वरील विषयी अर्जदार खालील प्रमाणे अर्ज सादर करतो की,

१) असे की, अर्जदार हा मौजे खुलताबाद, ता. खुलताबाद, जि औरंगाबाद, येथील रहिवासी असून अर्जदार व त्यांचे वडिल निसार पि. युसूफ कुरेशी हे जनावरे खरेदी विक्री करण्याचा व्यापार करुन त्याचा व त्याच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो. अर्जदार यांच्या वडिलांकडे कृषी उत्पन्न बाजार समिती खुलताबाद यांनी दि २८/०२/२००९ रोजी दिलेल्या जनावरे खरेदी विक्री अधिकाराबाबतचे आय. डी. कार्ड उपलब्ध आहे. सदर आय डी कार्ड अर्जदार हे अर्जासोबत जोडत आहे.